**११.** व **१२.** ** ** **

सेवेच्या पुरवठ्याची वेळ.

**१३.** (१) व (२)

(३) ज्या पुरवठ्याच्या बाबतीत कर भरला असेल किंवा प्रत्यावर्ती आकाराच्या आधारे भरावयासाठी पात्र असेल त्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठ्याची वेळ ही, पुढील दिनांकांपैकी जी अगोदरची असेल ती असेल :-

**(क)** ** ** **

(ख) पुरवठादाराने बीजक किंवा त्याच्याऐवजी, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा अन्य कोणताही दस्तऐवज दिल्याच्या दिनांकापासून पुढील साठ दिवसांच्या लगतनंतरचा दिनांकः

परतु, जेव्हा खंड (क) किंवा (ख) अन्वये पुरवठ्याची वेळ निश्चित करणे शक्य नसेल तर, पुरवठा प्राप्तकर्त्यांच्या लेखा पुस्तकातील नोंदीचा दिनांक हा, पुरवठ्याची वेळ असेल :

परंतु आणखी असे की, सहयोगी उपक्रमांनी पुरवठा करण्याच्या बाबतीत, जेथे सेवा पुरवठादार हा भारताबाहेर स्थित असेल तर, पुरवठ्याची वेळ ही, पुरवठा प्राप्तकर्त्याच्या लेखा पुस्तकातील नोंदीचा दिनांक किंवा प्रदानाचा दिनांक, यांपैकी जो अगोदरचा असेल, तो दिनांक म्हणजे पुरवठ्याची वेळ असेल.

(४) ते (६) ** ** **

**१४.** ते **१६.** ** ** **

जमा रक्कम व रोखलेली जमा रक्कम पांचे संविभाजन.

**१७.** (१) ते (४) ** ** **

(५) कलम १६ च्या पोट-कलम (१) मध्ये व कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निविष्टी कर जमा पुढील बाबतीत उपलब्ध असणार नाहीत :—

(क) ते (ज) ** ** **

(झ) कलम ७४, १२९ व १३० च्या संदर्भात प्रदान केलेला कोणताही कर.

(६) ** ** **

**१८.** व **१९.** ** ** **

निविष्टी सेवा वितरकाने जमा रकमेचे वितरण करण्याची रीत

**२०.** (१) निविष्टी सेवा वितरक, विहित करण्यात येईल अशा रीतीने, वितरित करण्यात येणा-या निविष्टी कराची जमा रक्कम अंतर्भूत असणारे दस्तऐवज देऊन, त्याद्वारे राज्य कर हा राज्य कर किंवा एकात्मिक कर म्हणून आणि एकात्मिक कर हा एकात्मिक कर किंवा राज्य कर म्हणून वितरित करील.

(२) निविष्टी सेवा वितरकास, पुढील शर्तीस अधीन राहून, जमा रक्कम वितरित करता येईल :—

(क) जमा रक्कम विहित करता येईल अशा तपशिलांचा समावेश असलेल्या दस्तऐवजानुसार जमा रकमेच्या प्राप्तकर्त्यास वितरित करता येऊ शकेल;

(ख) वितरित केलेली जमा रक्कम, वितरणासाठी उपलब्ध असलेल्या जमा रकमेपेक्षा अधिक असणार नाही;

(ग) जमा रकमेच्या प्राप्तकर्त्यांशी संबंधित असलेल्या निविष्टी सेवांवर प्रदान केलेल्या कराची जमा रक्कम, केवळ त्याच प्राप्तकर्त्यास वितरित करण्यात येईल;

(घ) जमा रकमेच्या एकाहून अधिक प्राप्तकर्त्यांशी संबंधित असलेल्या निविष्टी सेवांवर प्रदान केलेल्या कराची जमा रक्कम, ज्यांच्याशी निविष्टी सेवा संबंधित असेल अशा प्राप्तकर्त्यांमध्ये वितरित करण्यात येईल आणि असे वितरण, संबंद्ध कालावधीतील अशा प्राप्तकर्त्याच्या राज्यातील उलाढालीच्या किंवा संघराज्य क्षेत्रातील उलाढालीच्या आधारे, ज्यांच्याशी अशा निविष्टी सेवा संबंधित असतील आणि जे उक्त संबंद्ध

कालावधीमधील चालू वर्षात कार्यरत असतील, अशा सर्व प्राप्तकर्त्यांच्या एकूण उलाढालीच्या यथाप्रमाणात करण्यात येईल;

(ङ) जमा रकमेच्या सर्व प्राप्तकर्त्यांशी संबंधित असलेल्या निविष्टी सेवांवर प्रदान केलेली कराची जमा रक्कम, अशा प्राप्तकर्त्यांमध्ये वितरित करण्यात येईल आणि असे वितरण, संबंद्ध कालावधीतील अशा प्राप्तकर्त्यांच्या राज्यातील उलाढालींच्या किंवा संघराज्य क्षेत्रातील उलाढालींच्या आधारे, जे उक्त कालावधीमधील चालू वर्षात कार्यरत असतील त्या सर्व प्राप्तकर्त्यांच्या एकूण उलाढालीच्या यथाप्रमाण करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.** या कलमाच्या प्रयोजनार्थ.—

(क) "संबद्ध कालावधी" हा.-

(एक) जर, जमा रकमेच्या प्राप्तकर्त्याची ज्या वर्षात जमा रक्कम वितरित करावयाची असेल, त्या वर्षाच्या आधीच्या वित्तीय वर्षात त्यांच्या राज्यांत किंवा संघराज्य क्षेत्रांत उलाढाल असेल ते उक्त वित्तीय वर्ष; किंवा

(दोन) जर, जमा रकमेच्या काही किंवा सर्व प्राप्तकर्त्यांची ज्या वर्षात जमा रक्कम वितरित करावयाची असेल त्या वर्षाच्या आधीच्या वित्तीय वर्षामध्ये त्यांच्या राज्यांत किंवा संघ राज्यक्षेत्रांत कोणतीही उलाढाल नसेल, तर ज्या महिन्यात जमा रक्कम वितरित करावयाची असेल त्या महिन्याच्या आधीची जेव्हा अशा सर्व प्राप्तकर्त्यांच्या अशा उलाढालीचा तपशील उपलब्ध असेल ती अंतिम तीमाही.

(ख) "जमा रकमेचा प्राप्तकर्ता" या शब्दप्रयोगाचा अर्थ, निविष्टी सेवा वितरकाकडील असलेल्या स्थायी खाते क्रमांक (पॅन) असलेला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही यांचा पुरवठादार, असा आहे.

(ग) या अधिनियमान्वये करपात्र वस्तू तसेच करपात्र नसलेल्या वस्तू यांचा पुरवठा करणा-या कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीच्या संबंधातील "उलाढाल" याचा अर्थ, संविधानाच्या सातव्या अनुसूचीच्या सूची एकच्या नोंदी ८४ आणि ९२क अन्वये आणि उक्त अनुसूचीच्या सूची दोनच्या नोंद ५१ व ५४ अन्वये आकारण्यात आलेल्या कोणत्याही शुल्काच्या किंवा कराच्या रकमेद्वारे घटविण्यात आलेले उलाढालीचे मूल्य, असा आहे.

अधिक रकमेने वितरित करण्यात आलेल्या जमा रकमेच्या वसूलीची रीत.

**२१.** निविष्टी सेवावितरकाने कलम २० मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करून जमा रकमेचे वितरण केल्याच्या परिणामी, जमा रकमेच्या एका व त्यापेक्षा अधिक प्राप्तकर्त्यास जमा रकमेचे अतिरिक्त वितरण केल्यास, अशा प्रकारे वितरित करण्यात आलेली अधिक जमा रक्कम अशा प्राप्तकर्त्यांकडून व्याजासह वसूल करण्यात येईल आणि अशी वसूल करावयाची रक्कम निश्चित करण्यासाठी कलम ७३ किंवा यथास्थिति, कलम ७४ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह त्यास लागू होतील.

**२२.** ते **२९.** ** ** **

नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेणे.

**३०.** (१) ** ** **

(२) समुचित अधिका-यास, या बाबतीत विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत आदेशाद्वारे एकतर नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेता येईल किंवा अर्ज फेटाळता येईल;

परंतु, अर्जदारास, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेण्यासाठी केलेला अर्ज फेटाळण्यात येणार नाही.

(३) ** ** **

कराचे बीजक.

**३१.** (१) व (२) ** ** **

(३) पोट-कलमे (१) आणि (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) ते (ङ) ** ** **

(च) कलम ९ च्या पोट-कलम (३) किया पोट-कलम (४) अन्वये कर भरण्यास दायी असलेली नोंदणीकृत व्यक्ती, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही प्राप्त झाल्याच्या दिनांकास जो नोंदणीकृत नसेल अशा पुरवठादाराकडून तिला प्राप्त झालेल्या वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या संबंधात बीजक देईल.

(छ) कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये कर भरण्यास दायी असलेली नोंदणीकृत व्यक्ती, पुरवठादारास प्रदान करतेवेळी प्रदान प्रमाणक देईल.

(४) ते (७) ** ** **

**३१.** (१) व (२) ** ** **

**३१क.** ** ** **

**३२.** ते **३४** ** ** **

लेखे व इतर अभिलेख.

**३५.** (१) ते (५) ** ** **

(६) कलम १७ च्या पोट-कलम (५) च्या खंड (ज) च्या तरतुदींच्या अधीन राहून, जेथे नोंदणीकृत व्यक्ती, पोट-कलम (१) अनुसार वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा लेखा ठेवण्यात कसूर करील तेथे, समुचित अधिकारी, जणू काही अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा अशा व्यक्तींकडून पुरवठा करण्यात आला होता असे समजून, हिशेबात न घेतलेल्या अशा वस्तू किंवा सेवांवर किंवा दोन्हींवर देय असलेली कराची रक्कम, निश्चित करील, आणि त्याबाबतीत कलम ७३ किंवा, यथास्थिति, कलम ७४ च्या तरतुदी असे कर निश्चित करण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

**३६.** ते **३८.** ** ** **

विवरणे दाखल करणे.

**३९.** (१) व (२) ** ** **

(३) जिला कलम ५१ च्या तरतुदीअन्वये मूळ स्रोतातून कर संकलन करणे आवश्यक असेल, ती प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, ज्या महिन्यात अशा वजाती केलेल्या असतील अशा महिन्याचे विवरण, अशा महिन्याच्या समाप्तीनंतर दहा दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

(४) ते (११) ** ** **

**४०.** ते **४८.** ** ** **

कर, व्याज, शास्ती व इतर रकमा यांचे प्रदान.

**४९.** (१) ते (७) ** ** **

(८) प्रत्येक करपात्र व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमांखाली आपला कर आणि इतर देणी पुढील क्रमाने चुकती करील :....

(क) व (ख) ** ** **

(ग) कलम ७३ किंवा ७४ अन्वये निश्चित केलेल्या मागणीसह या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये देय असलेली इतर कोणतीही रक्कम.

(९) ते (११) ** ** **

**४९क.** व **४९ख.** ** ** **

**५०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदीनुसार किवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार कर भरण्यास पात्र असलेली परंतु विहित कालावधीत शासनाकडे तो कर किंवा त्या कराचा कोणताही भाग भरण्यात कसूर करणारी अशी प्रत्येक व्यक्ती, ज्या कालावधीसाठी कर किंवा त्याचा कोणताही भाग भरावयाचा राहिला असेल त्या कालावधीसाठी, परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे अठरा टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा दराने, स्वतःहून व्याज भरील. कराच्या विलंबित. प्रदानावरील व्याज.

परंतु, एखाद्या कर कालावधीत केलेल्या आणि कलम ३९ च्या तरतुदींनुसार नियत दिनांकानंतर सादर केलेल्या उक्त कालावधीच्या विवरणात घोषित केलेल्या पुरवठ्यांच्या बाबतीत, प्रदेय असलेल्या करावरील व्याज हे, असे विवरण उक्त कालावधीच्या बाबतीतील कलम ७३ किवा कलम ७४ अन्वये कोणतीही कार्यवाही सुरू केल्यानंतर सादर केले असेल त्याखेरीज, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतून जो कर भरला असेल त्या कराच्या भागावर आकारण्यात येईल.

(२) व (३) ** ** **

**५१.** (१) ते (६) ** ** ** मूळ स्त्रोतातून कराची वजात.

(७) या कलमाखालील कसुरीच्या रकमेची निश्चिती, कलम ७३ किंवा कलम ७४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने करण्यात येईल.

(८) ** ** **

**५२.** व **५३.** ** ** **

**५४.** (१) व (२) ** ** ** कराचा परतावा.

(३) पोट-कलम (१०) च्या तरतुदींना अधीन राहून, नोंदणीकृत व्यक्तीस, कोणत्याही कर कालावधीच्या शेवटी न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या कोणत्याही परताव्याचा दावा करता येईलः

परंतु,-

(एक) कराचे प्रदान न करता शून्याधारित पुरवठा केला असेल;

(दोन) जेथे परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या पुरवठ्याव्यतिरिक्त जावक पुरवठ्यावरील (निरंक दराने किंवा पूर्णतः सूट दिलेल्या पुरवठ्यांव्यतिरिक्त) कराच्या दराहून अधिक दर असणा-या निविष्टीवरील कराच्या दरामुळे जमा रक्कम संचित झाली असेल, तेथे त्यांखेरीज इतर कोणत्याही बाबतीत, न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा कोणताही परतावा दिला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, जेथे निर्यात शुल्कास अधीन राहून, वस्तू भारताबाहेर निर्यात केल्या असतील त्याबाबतीत, कोणत्याही न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा परतावा दिला जाणार नाही :

परंतु तसेच, जर वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठादाराने, अशा पुरवठ्यांवर प्रदान केलेल्या एकात्मिक कराच्या परताव्याचा दावा केला असेल तर, कोणत्याही निविष्टी कराच्या जमा रकमेचा परतावा दिला जाणार नाही.

(४) ते (१४) ** ** **

**५५.** ते **६०.** ** ** **

**६१.** (१) ते (२) ** ** ** विवरणांची छाननी.

(३) समुचित अधिका-याकडून, कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत किंवा त्याच्याकडून परवानगी देण्यात येईल अशा वाढीव कालावधीच्या आत समाधानकारक स्पष्टीकरण सादर न केल्याच्या बाबतीत किंवा नोंदणीकृत व्यक्तीने, त्या विसंगती मान्य केल्यानंतर, ज्या महिन्यातील त्या विसंगती मान्य केल्या असतील त्या महिन्याच्या आपल्या विवरणामध्ये सुधारात्मक उपाय योजण्यात कसूर केल्याच्या बाबतीत, समुचित अधिका-यास, कलम ६५ किंवा कलम ६६ किंवा कलम ६७ अन्वये असेल त्यांसह योग्य ती कार्यवाही सुरू करता येईल, किंवा कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कर आणि इतर देणी निश्चित करण्याची कार्यवाही करता येईल.

विवरण दाखल न करणा-या व्यक्तीचे निर्धारण.

**६२.** (१) कलम ७३ किंवा कलम ७४ मध्ये एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी नोंदणीकृत व्यक्ती, कलम ४६ अन्वये नोटीस बजावल्यानंतरसुद्धा, कलम ३९ किवा कलम ४५ खालील आवश्यक ते विवरण दाखल करण्यात कसूर करील त्या बाबतीत, समुचित अधिका-यास, उपलब्ध असतील किंवा त्यांने गोळा केलेली असतील अशी सर्व संबंधित तथ्ये विचारात घेऊन, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार उक्त व्यक्तीच्या कर दायित्वाच्या निर्धारणाची कार्यवाही करता येईल आणि कलम ४४ अन्वये विनिर्दिष्ट तारखेपासून ज्या वर्षाशी संबंधित कर भरलेला नसेल त्या वर्षाचे वार्षिक विवरण दाखल करण्यास पाच वर्षांच्या कालावधीच्या आत निर्धारण आदेश काढता येईल.

(२) ** ** **

नोंदणी न केलेल्या व्यक्चतींचे निर्धारण.

**६३.** कलम ७३ किवा कलम ७४ यांमध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी करपात्र व्यक्ती नोंदणी केली जाण्यास पात्र असूनही नोंदणी प्राप्त करण्यात कसूर करील किंवा कलम २९ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्याची नोंदणी रद्द करण्यात आली आहे परंतु तो कर भरण्यास पात्र होता, त्याबाबतीत, समुचित अधिका-यास, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार संबंधित कर कालावधीतील अशा करपात्र व्यक्तीच्या कर दायित्वाचे निर्धारण करता येईल आणि कलम ४४ अन्वये विनिर्दिष्ट तारखेपासून ज्या वर्षाशी संबंधित कर भरलेला नसेल त्या वर्षाचे वार्षिक विवरण दाखल करण्यास पाच वर्षाच्या कालावधीच्या आत निर्धारण आदेश काढता येईल :

परंतु, त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय असा कोणताही निर्धारण आदेश पारित करता येणार नाही.

विवक्षित विशेष प्रकरणांत विनासोपस्कार निर्धारण करणे.

**६४.** (१) ** ** **

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेला आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत करपात्र व्यक्तीने अर्ज केल्यावर किंवा अपर आयुक्तास किंवा सह आयुक्तास स्वतःहून असे आदेश चुकीचे आहेत असे वाटत असेल तर, तो असे आदेश मागे घेईल आणि कलम ७३ किंवा ७४ मध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करील.

कर प्राधिका-यांनी लेखापरीक्षा करणे.

**६५.** (१) ते (६) ** ** **

(७) पोट-कलम (१) अन्वये आयोजित केलेल्या लेखापरीक्षेच्या परिणामी कर भरला नसल्याचे किंवा तो कमी भरला असल्याचे किंवा चुकीने परतावा दिल्याचे किंवा चुकीने निविष्टी कराची जमा रक्कम घेतल्याचे किंवा त्याचा वापर केल्याचे उघडकीस आले असेल त्याबाबतीत, समुचित **अधिका-यास** कलम ७३ किंवा ७४ अन्वये कारवाई सुरू करता येईल.

विशेष लेखापरीक्षा.

**६६.** (१) ते (५) ** ** **

(६) पोट-कलम (१) अन्वये आयोजित केलेल्या विशेष लेखापरीक्षेच्या परिणामी, कर भरला नसल्याचे किंवा तो कमी भरला असल्याचे किंवा चुकीने परतावा दिल्याचे किंवा चुकीने निविष्टी कराची जमा रक्कम घेतल्याचे किंवा त्याचा वापर केल्याचे उघडकीस आले असेल त्याबाबतीत, समुचित **अधिका-यास** कलम ७३ किंवा ७४ अन्वये कारवाई सुरू करता येईल.

(११) एखाद्या वादप्रश्नावर अपील प्राधिका-याने किंवा अपील न्यायाधिकरणाने किंवा उच्च न्यायालयाने आपला निर्णय दिलेला असेल आणि तो निर्णय एखाद्या दुस-या कार्यवाहीतील महसुली हितास बाधक ठरत असेल आणि त्या अपील प्राधिका-याच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या किंवा, उच्च न्यायालयाच्या अशा निर्णयाविरुद्ध अनुक्रमे, अपील न्यायाधिकरणात किंवा उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात केलेले अपील प्रलंबित असेल तेव्हा जेथे उक्त कलमान्वये कारणे दाखवा नोटीस देऊन कार्यवाही सुरू झाली असेल, तेथे अपिलावरील प्राधिका-याच्या निर्णयाचा दिनांक आणि अपील न्यायाधिकरणाच्या निर्णयाचा दिनांक आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दिनांक किंवा, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दिनांक यांमध्ये व्यतित झालेला कालावधी, कलम ७३ च्या पोट-कलम (१०) मध्ये किंवा, यथास्थिति, कलम ७४ च्या पोट-कलम (१०) मध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी मोजताना, वगळण्यात येईल.

(१२) कलम ७३ किंवा ७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३९ अन्वये सादर केलेल्या कोणत्याही विवरणानुसार स्वयंनिर्धारित केलेली कराची कोणतीही रक्कम एकतर पूर्णतः किंवा अंशतः भरलेली नसेल किंवा अशा कराच्या रकमेवर देय असलेली व्याजाची कोणतीही रक्कम भरलेली नसेल त्याबाबतीत, ती रक्कम कलम ७९ मधील तरतुदींअन्वये वसूल करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ “स्वयंनिर्धारित केलेला कर” या शब्दप्रयोगात, कलम ३७ अन्वये दाखल केलेल्या जावक पुरवठ्याच्या तपशिलाप्रमाणे प्रदेय असलेल्या कराचा समावेश असेल, परंतु ज्याचा समावेश कलम ३९ अन्वये दाखल केलेल्या विवरणामध्ये केलेला नाही.

(१३) एखाद्या व्यक्तीवर एकाच कृती व अकृतीसाठी कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कोणतीही शास्ती लादण्यात आली असेल तर, या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींअन्वये त्याच व्यक्तीवर कोणतीही शास्ती लादण्यात येणार नाही.

**७६.** ते **१०३.** ** ** **

विवक्षित परिस्थितीमध्ये आगाऊ अधिनिर्णय निरर्थक ठरणे.

**१०४.** (१) जेथे, प्राधिकरणास किंवा अपील प्राधिकरणास किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरणास कलम ९८ च्या पोट-कलम (४) अन्वये किंवा कलम १०१ च्या पोट-कलम (१) अन्वये किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १०१ ग अन्वये, अधिघोषित करण्यात आलेला आगाऊ अधिनिर्णय, अर्जदाराने किंवा अपीलकर्त्याने लबाडीने, प्रत्यक्ष वस्तुस्थिती दडपून किंवा वस्तुस्थितीचा विपर्यास करून, प्राप्त केला आहे, असे आढळले तर, प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरण किंवा राष्ट्रीय अपील प्राधिकरण, असा अधिनिर्णय प्रारंभापासून निरर्थक असल्याचे आदेशाद्वारे घोषित करील आणि त्यानंतर या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व तरतुदी, जणू काही असा आगाऊ अधिनिर्णय देण्यातच आला नव्हता असे मानून, अर्जदाराला लागू होतील:

परंतु, अर्जदाराला किंवा अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय या पोट-कलमान्वये कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.—**कलम ७३ ची पोट-कलमे (२) व (१०) आणि कलम ७४ ची पोट-कलमे (२) व (१०) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीची गणना करताना, अशा आगाऊ अधिनिर्णयाच्या दिनांकाने सुरू होणारा व या पोट-कलमान्वये आदेशाच्या दिनांकाने समाप्त होणारा कालावधी, वगळण्यात येईल.

(२) ** ** **

**१०५.** व **१०६.** ** ** **

अपील प्राधिका-याकडे अपिले करणे.

**१०७.** (१) ते (५) ** ** **

(६) जर अपीलकर्त्याने, -

(क) ** ** **

